**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न**







**नाशिक:** महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायतराज विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सशक्त पंचायत, समृद्ध महाराष्ट्र - मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक ०४ सप्टेंबर २०२५ रोजी कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे संपन्न झाली. या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, पाणी फाउंडेशनचे डॉ. अविनाश पोळ, आदर्श ग्रामपंचायत मान्याचीवाडीचे सरपंच रविंद्र माने, ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. वर्षा फडोळ हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळेत जिल्ह्यातील सरपंच व ग्रामपंचायत सदस्य, गट विकास अधिकारी, सर्व ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत विभागांतर्गत कार्यरत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पवार यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सांगितले की, मी मुख्य कार्यकारी अधिकारी जरी असलो तरी माझी नाळ ग्रामीण भागाशी जोडलेली आहे, जिल्ह्यातील प्रत्येक गावात गावातल्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणारा गावकरी म्हणून मी तुमच्यासाठी सदैव उपलब्ध आहे, आपण मला कधीही संपर्क करू शकता असे म्हणत आपला भ्रमणध्वनी क्रमांक त्यांनी उपस्थितांना दिला. ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात देखील मेहनत घेऊन गावांचा सर्वांगीण विकास साधत नाशिक जिल्ह्याची राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळवण्याची परपंरा अखंड ठेवावी असे आवाहन उपस्थित सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना केले. लोकसहभाग व श्रमदानातून स्वच्छतेची चळवळ निर्माण करून रस्त्यांची दुरुस्ती, पाणंद रस्त्यांना प्राधान्य आणि इतर विकासकामे गावकऱ्यांच्या सहभागातून पूर्ण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव या संकल्पनेची अंमलबजावणी करताना पाण्याचा ताळेबंद तयार करणे, जलस्रोत व्यवस्थापन, वृक्ष लागवड व संवर्धन, सौर ऊर्जा व अपारंपरिक ऊर्जेचा वापर, प्लास्टिक बंदी तसेच घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या उपाययोजना ग्रामपंचायतींनी कराव्यात अशा सूचना देखील त्यांनी यावेळी केल्या.

आपल्या प्रस्ताविकात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) डॉ. वर्षा फडोळ यांनी सांगितले की, संयुक्त राष्ट्रांनी २०३० पर्यंत शाश्वत विकासाचे उद्दिष्ट निश्चित केले असून सर्वांना सोबत घेऊन चला हा त्याचा गाभा आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी हे अभियान आखले आहे. गाव हेच राज्य व देशाची मूलभूत ताकद असून गाव मजबूत झाले तर जिल्हा व राज्य आपोआप सक्षम होतील. त्यामुळे ग्रामपंचायतींना सुशासन, पारदर्शकता, लोकसहभाग व तांत्रिक बळकटी देणे हे या अभियानाचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना पाणी फाउंडेशनचे मुख्य मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ यांनी सांगितले की, ग्रामीण भागाचा शाश्वत विकास साधण्यासाठी ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामस्थांना सोबत घेऊन काम केल्यास विकासकामांना अपेक्षित गती मिळते. अभियान हे केवळ शासकीय उपक्रम न राहता लोकचळवळीत रुपांतरित झाल्यास त्याची खरी यशस्विता साध्य होते. गावातील लोकांच्या कौशल्यांना योग्य वाव दिल्यास ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे विकासाच्या प्रवाहात सामील होतात. नाशिक जिल्हा परिषदेची अशा अभियानांमध्ये यशस्वितेची परंपरा असून, ती परंपरा कायम राखत अधिक प्रभावी नियोजनाद्वारे हे अभियान यशस्वी करणे शक्य आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी आदर्श ग्रामपंचायत मान्याचीवाडी ता. पाटण जि. सातारा येथील सरपंच रविंद्र माने यांनी आपले अनुभव व्यक्त करताना सांगितले की, ग्रामस्थांच्या समस्या सोडवल्या तर ग्रामस्थ नक्कीच उत्स्फूर्तपणे सोबत येतात. ग्रामसभा हा आमच्या विकासाचा पाया असून, डिजिटल ग्रामसभा घेणारी मान्याचीवाडी ही राज्यातील पहिली ग्रामपंचायत आहे, हे त्यांनी नमूद केले. स्थानिक नागरिक ग्रामसभेला उपस्थित राहिले तरच प्रश्नांचे समाधानकारक निराकरण होते व वाद टाळले जातात असे त्यांनी यावेळी नमूद केले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे यांनी मनरेगा व इतर योजनांमध्ये अभिसरण साधून, रेशीम शेती लागवड, शेततळे, विहीर पुनर्भरण, जलसंवर्धन, ढाळीचे बांध, पशुपालन शेड, बायोगॅस, व्हर्मी कंपोस्टिंग आदी कामांना चालना देण्याचे निर्देश दिले. सक्षम पंचायत घडविण्यासाठी कर व पाणीपट्टीची नियमित वसुली, लोकवर्गणीच्या माध्यमातून लोकोपयोगी कामांची उभारणी तसेच पंचायतच्या स्वउत्पन्न (OSR) मध्ये वाढ घडवून आणण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.
सूत्रसंचालन ग्रामपंचायत अधिकारी बाळनाथ बोराडे यांनी केले.

**चौकट-**

कार्यक्रमादरम्यान काही महिला सरपंच यांना बसण्यासाठी खुर्ची उपलब्ध नसल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमकार पवार यांच्या निदर्शनास आले. त्वरित संवेदनशीलता दाखवत त्यांनी स्वतः मंचावरील खुर्ची सोडून मंचावर खाली बसत महिला सरपंच यांना सन्मानपूर्वक खुर्चीवर बसण्याचे आवाहन केले. यानंतर उपस्थित अधिकारी व सरपंच हे मंचावर खाली बसले, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दाखवलेली संवेदनशिलता हा प्रसंग चर्चेचा विषय ठरला.